मुंबई विद्यापीठ

क्र. टीएएएस(सीटी)/ 3 /२०१६–२०१७

परिपत्रक:—

मुंबई विद्यापीठाचे विभाग, संस्था, उपकेंद्र, महाविद्यालये व त्यांचे प्रमुख/ समन्वयक/प्राचार्य आणि मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित आणि कायम विनाअनुदानित, अल्पसंख्यांक महाविद्यालये व संस्थेतील संचालक/प्राचार्य/अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ ते ६ नोव्हेंबर, २०१६ हा कालावधी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त **"राष्ट्रीय एकता दिवस"** म्हणून साजरा करण्याबाबत मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे – १ यांनी पत्र क्र. उशिसं/२०१६/स.प.जयंती/मवि–१/१२१३९ दिनांक २४/१०/२०१६ अन्वये निर्देश दिलेले आहेत (प्रत संलग्न).

तरी प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिलेल्या सुचनांनुसार दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ ते ६ नोव्हेंबर, २०१६ हा कालावधी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त **"राष्ट्रीय एकता दिवस"** म्हणून आपल्या महाविद्यालयात साजरा करावा. सदर सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच यासंदर्भात दिनांक ३१ ऑक्टोबर व त्यानंतर घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचे फोटो दिनांक ६ नोव्हेंबर, २०१६ नंतर मा. मंत्री महोदय यांच्या Whats App व email वर टाकण्यात यावेत. या मोहिमेसाठी तयार करण्यात आलेला email- sardarpatelanniv2016@gmail.com व Whats App क्रमांक ०९९१००६३७०१ आहेत.

29/10/16

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :—

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाचे विभाग, संस्था, उपकेंद्र, महाविद्यालये व त्यांचे प्रमुख/ समन्वयक/प्राचार्य आणि मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित आणि कायम विनाअनुदानित, अल्पसंख्यांक महाविद्यालये व संस्थेतील संचालक/प्राचार्य/अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीसाठी रवाना :—

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२.
२. मा. डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११ ००१.
३. मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
४. मा. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
५. मा. सह–संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१.
६. मा. सह–संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा – रायगड – ४१० २०६.
७. मा. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
८. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
९. स्वीय सहायक, संचालक, बीसीयुडी, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
१०. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), कलिना, सांताक्रुझ, मुंबई–४०००९८.
११. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन क्र.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स क्र. ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/२०१६/स.प.जयंती /मवि-१ / 12139 दिनांक-२४/१०/२०१६

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

२) विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

**विषय :- सरदार पटेल यांची जयंती ( दि. ३१ ऑक्टोंबर ) राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्याबाबत.**

**संदर्भ** :- शासन निर्णय क्र. संकीर्ण- ११११/(प्र.क्र-१३७/१३)/समन्वय दिनांक.२१ ऑक्टोबर, २०१६

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये कळविण्यात येते की, दि.३१ आक्टोंबर २०१६ ते ०६ नोव्हेंबर, २०१६ हा कालावधी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त **"राष्ट्रीय एकता दिवस"** म्हणुन साजरा करण्याचे ठरविले आहे. तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढयात व स्वातंत्र प्राप्तीनंतर भारताच्या राजकीय एकीकरणाच्या कार्यात मोठे योगदान दिले आहे. म्हणुन त्यांना भारताचे लोहपुरुष म्हणुन ओळखण्यात येते. त्या अनुषंगाने त्यांच्या जयंतीनिमित्ताने आपल्या विभागाच्या अखत्यारीत विद्यापीठे / शासकीय महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांनी संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या मुद्या क्र. ०१ ते १० नुसार कार्यक्रम राबविण्यात यावे.

तसेच यासंदर्भात दिनांक ३१ ऑक्टोबर व त्यानंतर घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचे फोटो दिनांक ०६ नोव्हेंबर २०१६ नंतर मा. मत्री महोदय यांच्या Whats app वे e-mail वर टाकण्यात यावेत. या मोहीमेसाठी तयार करण्यात आलेला e-mail- sardarpatelanniv2016@gmail.com व Whats app क्रमांक **०९९१००६३७०१** आहेत.

तरी आपल्या अधिनस्त आसलेल्या सर्व विद्यापीठे, शासकीय /अशाकीय महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामध्ये दिनांक. ३१ ऑक्टोबर, २०१६ रोजी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात यावी. तसेच संदर्भिय शासन निर्णयात नमूद केलेल्या सुचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे.

**(डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत- १. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे खाजगी स्वीय सहाय्यक, विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

३. प्राचार्य, सर्व शासकीय/अशासकीय महाविद्यालय महाराष्ट्र राज्य, यांना पुढील कार्यवाहीस्तव रवाना.